मू.जे.महाविद्यालयातील ओजस्विनी कला विभागाचा विद्यार्थी पियुष प्रशांत बडगुजर याने रांची, झारखंड येथे कला प्रकारात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संघातून सहभाग घेत दैदीप्यमान यश मिळविले. त्याबद्दल त्याचा सत्कार प्राचार्य डॉ. उदय कुलकर्णी यांनी केला.



१६ ते २० फेब्रुवारी दरम्यान झालेल्या ३३ व्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात ८७ विद्यापीठांचे संघ सहभागी होते. यात उमवितर्फे ‘मू.जे.’चा पियुष बडगुजरने पोस्टर मेकिंग कलाप्रकारात सुवर्ण पदक तर फोटोग्राफी कलाप्रकारात चौथे पारितोषिक पटकावले. पियुषला स्नेहसंमेलनात सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणूनही गौरविण्यात आले होते.

पियुषच्या यशाबद्दल केसीई सोसायटीचे अध्यक्ष नंदकुमार बेंडाळे, ‘ओजस्विनी’चे प्राचार्य अविनाश काटे, तिन्ही शाखेचे उपप्राचार्य, समन्वयक यांनी अभिनंदन केले आहे. सत्कारावेळी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. जुगलकिशोर दुबे, संघ व्यवस्थापक प्रा. सागर बडगे उपस्थित होते.